**अति महत्वाचे**

जा.क्र. संसं/टिए/ ९४३ /२०१८
संशोधन संचालनालय,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला दिनांक : १५/११/२०१८

प्रति,

-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

विषय : ६४ व्या विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समिती (पश्चिम विदर्भ विभाग) रबी २०१८ सभेचा इतिवृत्तांत.

पश्चिम विदर्भ विभागाची रबी २०१८ हंगामाकरीता ६४ व्या विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक दिनांक ११.१०.२०१८ रोजी समिती सभागृह, कृषि महाविद्यालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे संपन्न झाली. सभेचा इतिवृत्तांत कार्यवाहीकरिता सोबत जोडला आहे.

सभेत घेतलेले निर्णय परिशिष्ट-१ मध्ये दिलेले आहेत तरी आपल्या विभागाशी संबंधीत निर्णयावर योग्य कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल ह्या कार्यालयास त्वरीत पाठवावा.

सोबत : वरील प्रमाणे

संशोधन संचालक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रतिलिपी,

१. मा. कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला ह्यांना माहितीकरिता सविनय सादर.
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहिती करिता सादर
३. व्यवस्थापकीय संचालक, महाबीज, अकोला
४. संचालक, विस्तार, विस्तार संचालनालय, कृषि व सहकार विभाग, कृषि विस्तार भवन (आयएआरआय कॅम्पस,) पुसा, नवी दिल्ली - ११००१२.
५. मा. कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक, संशोधन/विस्तार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२ ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे-७.
७. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
८. अधिष्ठाता, कृषि/कृषि अभियांत्रिकी/उद्यानविद्या, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला
९. विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती
१०. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
११. प्रकल्प संचालक, आत्मा, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१२. कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, (संशोधन), अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१३. उपवनसंरक्षक अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१४. जिल्हा मत्सव्यवसाय अधिकारी, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१५. उपसंचालक, पशुसवंर्धन व दुग्धशास्त्र, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१६. उपसंचालक, सामाजिक वनिकरण, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१७. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१८. विभाग प्रमुख, (सर्व) डॉ.पंदेकृवि, अकोला
१९. वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, (सर्व)/प्रभारी अधिकारी, संशोधन केन्द्र, (सर्व), डॉ.पंदेकृवि, अकोला
२०. उपसंचालक (बियाणे), डॉ. पंदेकृवि, अकोला
२१. विस्तार विद्यावेत्ता, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
२२. कार्यक्रम संमन्वयक, कृषि विज्ञान केंद्र,बुलढाणा/अकोला/करडा(रिसोड)/घातखेड/दुर्गापूर/जळगाव जामोद



Scanned by CamScanner

# ६४ व्या पश्चिम विदर्भ विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत

दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठामध्ये पश्चिम विदर्भ विभागाची विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीची रबी हंगाम नियोजनासाठी ६४ वी सभा मा. डॉ. व्हि. एम. भाले, कुलगुरु, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे अध्यक्षतेखाली व डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक व डॉ. दिलीप मानकर, संचालक कृषि विस्तार, श्री. एस. एन. नागरे, विभागीय सहसंचालक, अमरावती विभाग यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. सभेसाठी पश्चिम विदर्भ विभागातील सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विद्यापीठाचे सर्व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ व विभाग प्रमुख उपस्थित होते.

डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक यांनी प्रास्ताविकपर भाषणात, येणाऱ्या रबी हंगामातील पिकांचे नियोजन करतांना विद्यापीठ निर्मित सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन केले. देशपातळीवर सन २०१८-१९ वर्ष "राष्ट्रीय भरडधान्य वर्ष" म्हणून साजेर केले जात आहे आणि त्यानुसार यापिकांचे नियोजन करण्यावर भर देण्यात यावा असे आवाहन केले. तसेच विद्यापीठ सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करित असल्याने कृषि विभागाने अधिकाधिक शेतकरी बांधवांना प्रेरित करुन आगामी २०, २१ व २२ ऑक्टोबर, २०१८ ला आयोजित शिवार फेरी मध्ये राहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

श्री. एस. एन. नागरे, विभागीय कृषि सहसंचालक यांनी रबी हंगामाकरिता बियाणे व खताचे नियोजन पूर्ण झाले आहे. परंतु जमिनीत पर्याप्त ओलावा नसल्याने चिंता व्यक्त केली. तसेच शासनाने दुष्काळ घोषित करण्याच्या नवीन मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार माहिती संकलित करुन तालुकानिहाय अहवाल सादर करावा असे कृषि विभागाचे अधिकारी व विद्यापीठ शास्त्रज्ञ यांना आवाहन केले.

मा. डॉ. विलास भाले, आदरणीय कुलगुरु, डॉ. पंदेकृवि, अकोला यांनी अध्यक्षीय भाषणात सांगीतले की, विद्यापीठाच्या संशोधनाची काटेकोरपणे कार्यवाही करावी. सद्यस्थितीत जमिनीतील ओलावा कमी असल्याने जमिनीच्या प्रकारानुसार पिकांचे नियोजन करावे. हवामानातील बदलास सामोर जावून बदलत्या हवामानाचे पिकाच्या उत्पादकतेवर होणारा परिणाम यांवा सुक्ष्म अभ्यास करुन त्याचा अहवाल सादर करावा असे शास्त्रज्ञांना आवाहन केले. कृषि विभाग व विद्यापीठ समन्वयाने राबविलेल्या मोहीमेमुळे या हंगामात गुंलाबी बोंड अळीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे झाल्याने कृषि विभागातील अधिकारी व विद्यापीठातील शास्त्रज्ञ यांचे अभिनंदन केले. रबी हंगामासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षिय भाषणानंतर डॉ. मंगला घनबहादुर, सहयोगी संशोधन संचालक यांनी सन २०१७ च्या ६२ व्या रबी हंगाम पश्चिम विदर्भ विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभागृहात सादर केला व तो सभागृहाद्वारे मान्य करण्यात आला.

तद्नंतर कृषि हवामान शास्त्रज्ञ डॉ. अनिल करुणाकर, सहयोगी प्राध्यापक यांनी खरीप हंगामात मान्सुनचे आगमन जून महिन्यात होवून जुलै मध्ये सरासरी पावसाची नोंद झाली. तसेच ऑगष्ट-सप्टेंबर महिन्यात पावसातील मोठा खंड पडल्याचे सांगीतले. त्यांनी या दरम्यान जिल्हा व तालुकानिहाय पडलेला पाऊस व पावसाचे दिवस त्याबाबतची सविस्तर माहिती दिली. मा. कुलगुरु आणि संशोधन संचालक यांनी हवामान शास्त्रज्ञांनी यापुढे अभ्यासपूर्ण विश्लेषण करुन सविस्तर संदेश पुढील हंगामाच्या दृष्टीकोणातून तपशीलवार तयार करावा व सादरीकरण करावे असे सूचित केले.

## जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अहवाल

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला, अमरावती, बुलढाणा व वाशिम यांनी आपआपल्या जिल्ह्याचे अहवाल सभागृहात सादर केलेत. यामध्ये रब्बी-उन्हाळी पीक नियोजन, शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना/प्रकल्प सिंचन, सुविधा, पर्जन्यमान, लागवडी खालील विविध पीक वाण, रब्बी-उन्हाळी पिकांचे नियोजन व निविष्ठांचे प्राप्त आवंटन इत्यादीबाबत माहिती दिली. यावर्षी रब्बी उन्हाळी हंगामातील पिकांचे नियोजित क्षेत्राबाबतची जिल्हावार माहिती खालील तक्त्यामध्ये दिली आहे.

Scanned by CamScanner

१. अकोला जिल्ह्यातील रबी-उन्हाळी पीक नियोजन

| अ.क्र. | पिकांचे नाव | सरासरी क्षेत्र (हे.) | २०१७-१८ मधील क्षेत्र (हे) | २०१८-१९ करिता प्रस्तावित क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|
| १ | रबी ज्वारी | १४६ | २.५ | १४३० |
| २ | मका | ३२० | १७९ | ४०० |
| ३ | गहू | ३८२९० | १५६३१ | ३१३०० |
| ४ | हरभरा | ७०६०० | ७५३३६ | १०२००० |
| ५ | करडई | ३५६० | ५४ | १००० |
| ६ | सुर्यफूल | २५५० | - | ७०० |
| ७ | रबी कांदा | - | १७२४ | ३००० |
| ८ | भाजीपाला/ इतर | - | ६६० | १००० |
| | एकूण | ११५४६६ | ९३५८६.५० | १४०८३० |

**प्रत्याभरण**

१. मुग/उडीद पिकावर खरीप २०१८ मध्ये तेल्हारा तालुक्यात लेग्युम मॉथचा प्रादुर्भाव आढळून आला. परंतु या किडीच्या व्यवस्थापनाकरिता शिफरस व लेबल क्लेम नसल्याने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना अडचणी निर्माण होतात. तरी सदर बाबतीत शिफारशी मिळाव्यात.
२. गहू पिकाच्या सध्या उपलब्ध जातीच्या उत्पादनावर थंडीचा कालावधीचा मोठा परिणाम दिसून येतो. मात्र सद्यस्थितीत थंडीचा कालावधी कमी होत असल्याने उत्पन्नावर त्याचा परिणाम दिसून येत आहे. तरी त्यानुसार संशोधन होवून थंडीच्या कमी कालावधीत उत्पादन देणारे वाण संशोधीत होणे गरजेचे आहे.
३. उन्हाळी हंगामात योजने अंतर्गत भुईमुग पीक प्रात्यक्षिक प्रकल्पा अंतर्गत प्रमाणित बियाणे वितरणाकरिता १५ वर्षाआतिल प्रसारित वाण तसेच बिजोत्पादनाकरिता १० वर्षा आतिल प्रसारीत वाण उपलब्ध नाही. त्याअनुषंगाने नविन वाण प्रसारीत करयाची आवश्यकता आहे.
४. सेंद्रिय शेतीबाबत शेतकऱ्यांची आस्था वाढत असून सेंद्रिय शेती मध्ये जैविक कीटकनाशके, जैविक खते, सेंद्रिय खते उपलब्ध आहेत, मात्र तण व्यवस्थापणाकरिता जैविक तणनाशक नसल्याने त्याबाबत योग्य ते संशोधनाची गरज आहे.
५. खारपाण पट्ट्यासाठी शेततळय व्यतिरिक्त मृद व जल सुधारणाचे उपाय संशोधनाअंती शिफारसीत करावे.

२. अमरावती जिल्ह्यातील रबी-उन्हाळी पीक नियोजन

| अ.क्र. | पिकांचे नाव | सरासरी क्षेत्र (हे.) | २०१७-१८ मधील क्षेत्र (हे) | २०१८-१९ करिता प्रस्तावित क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|
| १ | रबी ज्वारी | ६८ | ३१ | ३०० |
| २ | गहू | ५२९०६ | ३१७८१ | ६५००० |
| ३ | हरभरा | १०६१५३ | २२९४५ | १६०८०० |
| ४ | करडई | ४३ | ८ | १५० |
| ५ | सुर्यफूल | १ | - | - |
| ६ | मका | १३३० | ७१ | २३०० |
| | एकूण | १६०५०१ | ५४८३६ | २२८५५० |

**प्रत्याभरण**

१. संत्र्याबाबतीत फळगळीचे प्रमाण वाढले आहे याबाबत मार्गदर्शन व्हावे.
२. सोयाबीन, तुर, मुग पिकावर अमरवेलचे प्रमाण वाढल्यामुळे त्यावर संशोधन व मार्गदर्शन होणे आवश्यक आहे.
३. बीटी कपाशीवर आढळून आलेल्या शेंदरी बोंडअळीवर मार्गदर्शन होणे आवश्यक आहे.
४. हरभरा पिकासाठी लेबल क्लेम मध्ये तणनाशके उपलब्ध नसल्याने त्यावर मार्गदर्शन होणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

### ३. वाशिम जिल्ह्यातील रबी-उन्हाळी पीक नियोजन

| अ.क्र. | पिकांचे नाव | सरासरी क्षेत्र (हे.) | २०१७-१८ मधील क्षेत्र (हे) | २०१८-१९ करिता प्रस्तावित क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|
| १ | गहू | २२४४१ | ९९०३ | २०००० |
| २ | रबी ज्वारी | ८४० | ३९२ | ५००० |
| ३ | हरभरा | ६०३३० | ४९५८४ | ७२००० |
| ४ | करडई | ६६४ | ११७ | २००० |
| ५ | सुर्यफूल | ६८ | - | - |
| ६ | मका | ३०२ | १३७ | ५०० |
| ७ | इतर | ६७१ | - | - |
| | एकूण | ८५३१६ | ६०१३३ | ९९५०० |

**प्रत्याभरण**

१. वाशिम जिल्ह्यात डाळींब फळपिकाच्या क्षेत्रामध्ये वाढ होत आहे. परंतु प्रामुख्याने मृगबहार घेतला जातो तरी तिन्ही बहार व्यवस्थापनाच्या संबंधित शिफारसी मिळाव्यात जेणेकरुन वर्षभर चांगला पुरवठा होऊन योग्य भाव मिळेल.

२. संरक्षित शेती (शेडनेट व पॉलीहाउस) मध्ये पीक व्यवस्थापनाबद्यल शिफारसी देण्यात याव्यात.

३. नत्र,स्फुरद व पालाश या मुख्य अन्नद्रव्याच्या पिकनिहाय शिफारसी उपलब्ध आहेत. परंतु दुय्यम अन्नद्रव्य कॅलशियम, मॅग्नेशियम व सल्फर बाबत पिकनिहाय अधिकृत शिफासी उपलब्ध नाहीत, याबाबत विद्यापीठाकडून शिफारसी मिळाव्यात.

४. दिवसेंदिवस ठिबक सिंचनाखालील क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. ठिबकद्वारे विद्राव्य खताच्या पिकनिहाय अधिकृत शिफारसी उपलब्ध नाहीत. याबाबत विद्यापीठाकडून शिफारसी मिळाव्यात.

### ४. बुलढाणा जिल्ह्यातील रबी-उन्हाळी पीक नियोजन

| अ.क्र. | पिकांचे नाव | सरासरी क्षेत्र (हे.) | २०१७-१८ मधील क्षेत्र (हे) | २०१८-१९ करिता प्रस्तावित क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|
| १ | गहू | ५२९४० | ३५९१५ | ३२०४६ |
| २ | हरभरा | ७३९१० | १३२२४६ | १०९०९० |
| ३ | रबी ज्वारी | १६२३० | १३२३१ | १४०७४ |
| ४ | रब्बी सुर्यफूल | २३०० | ३५ | १७५ |
| ५ | मका | ३२०० | ६९४२ | ९६३२ |
| ६ | करडई | ३२०० | १३५ | १५९ |
| | एकूण | १५१७८० | १८८५०४ | १६५१७६ |

**प्रत्याभरण**

१. योजने अंतर्गत बिजोत्पादन करण्याकरिता १० वर्षा आतिल प्रसारीत वाण उपलबध नसल्याने हरभरा पिकाचे नविन वाण प्रसारीत करण्याची आवश्यकता आहे.

२. मान्सुनचे उशिरा आगमन व मान्सुनच्या सुरवातीच्या काळात पावसात पडणारा खंड या अनुषंगाने मुग व उडिद पिकाच्या उशीरा पेरणी करता येतील असे वाण प्रसारीत होण्याची आवश्यकता आहे.

३. डाळींब उतीसंवर्धीत रोपांना मागणी जास्त असल्याकारणाने डाळींब उतीसंवर्धन रोपांना रोहयो, मनरेगारोहयो मध्ये अंतर्भाव करण्याची शिफारस करण्यात यावी.



Scanned by CamScanner

**वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ यांचे अहवाल**

विविध पीक संशोधन योजनेतील वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, (गहू, तेलबिया, कडधान्य, ज्वारी, तणव्यवस्थापन) इत्यादींनी नवीन शिफारसीत पीक वाण, पीक लागवड तंत्रज्ञान, प्रथम रेषीय प्रात्यक्षिके अहवाल, तसेच मागील वर्षभरात करण्यात आलेल्या संशोधनाबाबतची माहिती सभागृहास दिली. सोबतच जिअकृअ यांनी उपस्थित केलेल्या प्रत्याभरणावर मार्गदर्शनपर उपाययोजना सुचविल्या. संशोधन संचालकांनी वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञांना आवाहन केले की, सद्याची परिस्थिती लक्षात घेता पुढील हंगामाच्या नियोजनाच्या दृष्टीने सादरीकरण करावे आणि सभागृहात प्रत देण्यात यावी असे सुचविले. त्यामध्ये प्रामुख्याने येणाऱ्या रबी हंगामाच्या दृष्टीने जमिनीतील कमी ओलावा असल्यामुळे आपल्याकडील उपलब्ध तंत्रज्ञान शिफारसींची माहिती देण्याविषयी सूचित केले. संरक्षित ओलीत उपलब्धतेनुसार कोणत्या पिकास केंव्हा व कसे सिंचन करावे या विषयी सभागृहास माहीती देण्यात आली. हरभरा बियाणे उत्पादनाविषयी विद्यापीठ प्रसारीत वाणाचे नोंदणी होईपर्यंत सुध्दा महाबीजने सत्यप्रत बियाणे उत्पादन शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोणातून सुरु करण्याविषयी सूचित करण्यात आले.

**विभाग प्रमुख यांचे अहवाल**

विभाग प्रमुख, उद्यानविद्या, किटकशास्त्र, वनस्पती रोगशास्त्र, कृषि शक्ती औजारे अभियांत्रिकी व कनिष्ठ उद्यान विद्यावेत्ता अ.भा.स.सं.प्र. (फळे) तथा उद्यान विद्यावेत्ता, मिरची व भाजीपाला संशोधन केंद्र, यांनी आपआपल्या विभागात करण्यात आलेल्या संशोधन तंत्रज्ञानाबाबत सादरीकरण करुन येणाऱ्या हंगामाच्या दृष्टीने महत्वाच्या सुचना सभागृहास सादर केल्या. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या जिल्हावार विविध विषयांवर विवेचन करण्यात आले.

मा. विभागीय कृषि सहसंचालक, श्री. एस. एन. नागरे यांनी रबी हंगामातील नियोजनामध्ये विद्यापीठ उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करुन सध्याच्या शेतातील परिस्थितीनुसार उपाययोजना कराव्यात असे आवाहन शेवटी केले.

मा. संशोधन संचालक, डॉ. विलास खर्चे यांनी सभेचा समारोप संपूर्ण मुद्येनिहाय सारांश रुपाने सांगून या वर्षीच्या रबी हंगामातील वस्तुस्थिती लक्षात घेवून संसाधने आणि शेतातील ओलाव्याची परिस्थिती, सिंचनाची सुविधा, सूक्ष्म सिंचनाचा वापर, संरक्षीत सिंचन इत्यादीनुसार पिकांचे नियोजन करुन त्यामध्ये विद्यापीठाच्या उपलब्ध सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर करण्याविषयी उदाहरणासह विवेचन करुन सभेचा समारोप केला आणि सर्वांना रबी हंगामासाठी शुभेच्छा दिल्या.

सभेत घेण्यात आलेले निर्णय/ठराव व त्यावर कार्यवाही करणारे अधिकारी या विषयीची माहिती परिशिष्ट-१ मध्ये दिलेली आहे. सभेचा कार्यवृत्तांत संकलन करण्याचे काम श्री. प्रकाश घाटोळ, सहाय्यक प्राध्यापक, डॉ. योगेश इंगळे, सहाय्यक प्राध्यापक, डॉ. ए. के. सदावर्ते, उपसंशोधन संचालक, डॉ. पंदेकृवि, अकोला यांनी केले.

डॉ. ए. के. सदावर्ते, उपसंशोधन संचालक यांनी केलेल्या आभार प्रदर्शनानंतर सभेची सांगता झाली.

सहयोगी संशोधन संचालक,
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

मा. संशोधन संचालक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला



Scanned by CamScanner

परिशिष्ट-१

## पश्चिम विदर्भ विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीच्या ६४ व्या सभेमध्ये घेण्यात आलेले निर्णय

| अ.क्र | निर्णय | कार्यवाही करणारे अधिकारी |
|---|---|---|
| १. | हवामानशास्त्रज्ञ यांनी आपले सादरीकरण मराठीतून करावे. तसेच उपलब्ध माहीतीचे विश्लेषण करुन येणाऱ्या हंगामासाठी उपाययोजना सुचविण्यात याव्यात. | हवामानशास्त्रज्ञ, कृषिविद्या विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| २. | वि.कृ.सं.वि. समितीच्या सभेत सादरीकरण करतांना रबी पिकांचे नियोजन याची सांगोपांग माहिती विषद करावी. तसेच याबाबतची जिल्हानिहाय मुद्रितप्रती सभागृहास आणि संशोधन संचालनालयास देण्यात यावी | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) |
| ३. | हरभरा पिकाचे वाण जॉकी-९२१८ अवर्षण स्थितीत सुध्दा अधिक उत्पादन देत असल्याने या वाणास अनुदान प्राप्त होण्यासाठी विशेषबाब म्हणून ५ वर्षे कालावधी वाढवून देवून अनुदानास पात्र करण्याकरिता मा. आयुक्त (कृषि) यांचेशी पत्र व्यवहार करावा. | उपसंचालक (बियाणे), डॉ. पंदेकृवि, अकोला व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (कडधान्य) |
| ४. | लिंबुफळ पिकांची अभिवृध्दी बियाणे द्वारे होत असल्याने तसेच किफायतशीर असल्याने शासन अध्यादेश मध्ये सूधार (कलम ऐवजी रोपे) करण्याकरिता मा.आयुक्त (कृषि) यांच्या सोबत सखोल विवेचनात्मक पत्र व्यवहार करावा. | अधिष्ठाता, उद्यानविद्या, डॉ. पंदेकृवि, अकोला व अभाससंप्र (फळे) |
| ५. | सभेत सादरीकरण करतांना पावर पॉईटमध्ये करावे. तसेच सभागृहातील उपस्थितांना पावर पॉईट्ची प्रत (पी.पी.टी.) न देता सविस्तर अहवालाची प्रत उपलब्ध करुन द्यावी. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) विभाग प्रमुख (सर्व), वरिष्ठ शास्त्रज्ञ (सर्व) |
| ५. | शेडनेट (शिमला मिर्ची) मधील बिजोत्पादनाची इत्यंभूत माहिती होण्याकरिता कृषि विज्ञान केंद्र, बारामती येथील प्रशिक्षणात कृषि विभाग व विद्यापीठ यांनी समन्वय साधून प्रशिक्षणात सहभाग घ्यावा. | प्रमुख, भाजीपाला विभाग, प्रभारी अधिकारी, मिरची व भाजीपाला, डॉ. पंदेकृवि, अकोला व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) |
| ६. | रबी मका पिकाची ज्या भागात लागवड आहे त्या भागात लष्कर अळी (*Spodoptera frugiperda*) या नविन किडीचे सर्व्हेक्षण करुन शेतकऱ्यामध्ये जागरुकता करावी. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| ७. | फळ पिकाचे नियोजनाबाबत कृषि विभागाने अद्यायावत तपशीलवार विभागवार माहिती द्यावी जेणे करुन रोपवाटीकामध्ये त्याप्रमाणात फळपिकांचे कलमांचे नियोजन करण्यास मदत होईल. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) |
| ८. | खारपाणपट्ट्यातील शेततळ्यामध्ये मत्स्यशेतीसाठी कोळंबी उत्पादन घेण्यात यावे व याबद्दल समन्वयातून शेतकऱ्यामध्ये प्रचार व प्रसार करावा. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) |



Scanned by CamScanner